| | |
|---|---|
| दाखल तारीख | २८/०८/२०२५ |
| नोंदणी तारीख | २८/०८/२०२५ |
| निर्णय तारीख | ३१/०७/२०२६ |
| कालावधी | ०० व., ११ म., ०३ दि.. |
| **CNR No. MHGA050010552025** | |

भाग – अ
(न्यायनिर्णयाची शीर्षक पान)
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (१)]

| | |
|---|---|
| **निशाणी क्र.०६ खाली** | |
| **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज यांचे न्यायालयात.**<br>(पिठासीन अधिकारी – सतिश गो. गोरे) | |
| **अपराध क्रमांकाचा तपशील** | **अपराध क्र.३९८/२०२५,** पोलीस स्टेशन, देसाईगंज. |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | ३१/०७/२०२६ |
| **प्रकरण क्रमांक** | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ८०५/२०२५** |
| **अभियोग पक्ष :** | **महाराष्ट्र शासन** तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>देसाईगंज, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली.<br>(शेजल देवराव घोडे,म.पो.शि,ब.नं.११६७) |
| **अभियोग पक्षातर्फे अधिवक्ता** | **श्री. आर.डब्ल्यु.सकिनलावार**<br>विशेष सहा. सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी :** | **नरेश अंबादास उके,**<br>वय – ५१ वर्ष, धंदा – शेती,<br>रा. कोरेगाव, ता. देसाईगंज,<br>जि. गडचिरोली. |
| **आरोपीतर्फे अधिवक्ता :** | **श्री. एम. आर. शेंडे,** |

भाग – ब
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (२)]

| | |
|---|---|
| एफ.आय.आर. दिनांक : | ०३/०८/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक : | ०३/०८/२०२५ |
| गुन्ह्याचा तपशील निश्चितीचा दिनांक : | २८/०८/२०२५ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक : | १८/११/२०२५ |
| निकालाकरिता ठेवल्याचा दिनांक : | २३/०७/२०२६ |
| निकाल दिनांक : | ३१/०७/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास तो दिनांक | ---- |

आरोपीचा तपशील

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिन तारीख | दोषारोप /आरोप | दोषी / निर्दोष | शिक्षा | तुरुंगामध्ये न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **नरेश अंबादास उके** | ... | २८/०८/२०२५ | ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा | निर्दोष | नाही | नाही |

**भाग – क**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने बोलाविलेल्या साक्षदारांची यादी**

| क्र. | नाव | साक्षदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | केवलराम वासुदेव निमकर (**नि.क्र.०६ खाली**) | पंच साक्षदार |
| अ.सा.क्र.२ | भाग्यवान गुडी मेश्राम (**नि.क्र.०६ खाली**) | पंच साक्षदार |

**बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी**

| अ.क्र. | नाव | साक्षेचे स्वरुप |
|---|---|---|
| ब.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

**न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी**

| अ. क्र. | नाव | साक्षेचे स्वरुप |
|---|---|---|
| न्या.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

**सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

मेटरीअल ऑब्जेक्ट/महत्त्वाच्या वस्तू

| अ. क्र. | मटेरिअल ऑब्जेक्ट /महत्त्वाच्या वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(जाहिर दिनांक ३१/०७/२०२६)

आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरिता संपरिक्षा चालविण्यात आली. खटल्याच्या न्यायनिर्णयाकरिता पुढील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील नमूद कारणांकरिता नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि. ०३/०८/२०२५ रोजी १७:४० ते १८.१५ वाजताच्या सुमारास, मौजा कोरेगाव, ता. देसाईगंज, जिल्हा गडचिरोली येथे आरोपी त्याच्या घरात प्रत्येकी ९० मिली मापाच्या ११ नग देशी दारू अवैधरित्या विना परवाना | ...नाही |

विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगताना मिळून आला?

२. आदेश काय ? **...अंतीम आदेशानुसार**

**मुद्दा क्र. १ करीता** :–

२. आरोपीवर ठेवलेला दोषारोप सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने साक्षीदार केवलराम वासुदेव निमकर **(अ.सा.क्र.१)** व भाग्यवान गुडी मेश्राम **(अ.सा.क्र.२)** यांना तपासले. अभियोग पक्षातर्फे पुरसीस **(नि.क्र.१०)** दाखल करून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरूद्ध कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आला नसल्यामुळे त्याचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१(१)(ब) अन्वये जवाब वगळण्यात आला.

३. केवलराम **(अ.सा.क्र.१)** व भाग्यवान **(अ.सा.क्र.२)** हे घरझडती/घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षदार असून त्यांच्या साक्षेत असे आले आहे की, ते आरोपीला ओळखतात. पोलिसांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलाविले नव्हते व त्यांच्यासमक्ष कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. त्यांनी घरझडती/घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे सांगितले. परंतु त्यातील मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली. त्यांना उलटतपासात विचारल्या जाणारे उत्तर सुचक प्रश्न अभियोग पक्षाद्वारे विचारले असता, त्यामध्येही त्यांनी पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्याकरिता मौजा कोरेगाव, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली येथे बोलाविले होते, त्या ठिकाणी आरोपीच्या घरातुन प्रत्येकी ९० मिली मापाच्या ११ नग देशी दारू जप्त केली होती व त्याबाबतचा घरझडती/घटनास्थळ जप्ती पंचनामा त्यांच्यासमक्ष तयार केला होता व त्यावर त्यांनी सहया केल्या होत्या, असे अभियोग पक्षाचे

कथन त्यांनी नाकारले.

४. अभियोग पक्षाद्वारे तपासण्यात आलेले पंच साक्षदार फितूर झालेले आहेत. अभियोग पक्षाने फिर्यादीची साक्ष न नोंदविल्यामुळे अभियोग पक्ष फिर्याद तसेच छापील प्रथम खबर अहवाल व त्यामधील मजकूर, घटनास्थळ कम जप्ती पंचनामा व त्यातील मजकूर सिद्ध करु शकला नाही. अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे नेमके कोणते जप्त नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविले होते, तसेच अभिलेखावर दाखल रासायनिक विश्लेषणाचा अहवाल हा नेमका कोणत्या प्रकरणातील जप्त नमुन्यांचा आहे, हे स्पष्ट होत नाही. वर चर्चिलेल्या बाबी लक्षात घेता आरोपी त्याच्या ताब्यात विना परवाना बेकायदेशीररित्या प्रत्येकी ९० मिली मापाच्या ११ नग देशी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून मिळून आला होता, ही बाब स्विकारार्ह नाही तसेच अभियोग पक्ष ती बाब सिद्ध करु शकला नाही.

५. कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा सिद्ध होण्यासाठी जप्त मुद्देमाल दारु आहे व ती दारु आरोपी विक्री करण्याच्या उद्देशाने विनापरवाना बाळगून होता, या बाबी सिद्ध होणे आवश्यक आहे. तसेच, आरोपीकडून दारु जप्त करुन ते प्रथम मुद्देमाल मोहररकडे पोलीस स्टेशनमध्ये जमा केले आणि त्यानंतर मुद्देमाल मोहररपासून त्यामध्ये कोणतीही अदलाबदल किंवा अफरातफर न करता ते रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविले, याबाबत स्पष्ट असा साखळी पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक असते.

६. वरील सर्व बाबींचा विचार केला असता असे दिसून येते की, अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यास अपयशी

ठरला आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :–**

**७.** मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. जप्त मुद्देमालापैकी रासायनिक विश्लेषणाकरिता काढलेल्या मुद्देमालाव्यतिरिक्त इतर मुद्देमाल अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गडचिरोली यांच्याकडे दि. १८.११.२०२५ च्या नि.क्र.०८ खालील आदेशानुसार आधीच त्याची विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात आलेला आहे, त्यामुळे त्याबाबत वेगळा आदेश करण्याची आवश्यकता नाही. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१(१) ची पूर्तता आधीच केली आहे, म्हणून मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपीला भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) खालील गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जात मुचलके व बंधपत्र रद्द करण्यात येते.

**(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

Digitally signed by SATISH GOPALRAO GORE
Date: 2026.07.31 15:40:03 +0530

दिनांक : ३१/०७/२०२६

**(सतिश गोपालराव गोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज.
JO CODE- MH02902